# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

| अ.क्र. | तपशील | | सविस्तर माहिती |
|---|---|---|---|
| १ | पीक/वाणाचे नाव | | मूग : बीएम-४ |
| २ | प्रसारीत केल्याचे वर्ष | | १९९४ |
| ३ | प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ | | मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी |
| ४ | जमीन | | जमिनीचा ६.५० ते ७.५० सामू, योग्य निच-याची मध्यम ते भारी जमीन |
| ५ | हवामान | | मूग पिकांस २१ ते २४ अंश सें. तापमान आवश्यक, ढगाळ वातावरण हानीकारक |
| ६ | पेरणी/लागवडीचा कालावधी | | जूनच्या शेवटचा ते जुलैचा पहीला आठवडा |
| ७ | प्रती एकर बियाणे | | ६ किलो |
| ८ | | | |
| | १ | लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन | हेक्टरी रोपांची संख्या योग्य राखण्याकरीता दोन ओळीतील अंतर ३० तर दोन रोपातील अंतर १० सें.मी. असावे. |
| | २ | खत व्यवस्थापन | पेरणीच्या वेळी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद हेक्टरी द्यावे. |
| | ३ | पाणी व्यवस्थापन | या पिकास पाण्याचा ताण पडल्यास फुलोरा अवस्थेत आणि शेंगा लागण्याच्या अवस्थेत पाणी द्यावे. |
| | ४ | कीड व्यवस्थापन | शेंगा पोखरणा-या अळीचा बंदोबस्त करण्याकरीता क्लोरपायरीफॉस २० ईसी २० मि.ली./दहा लीटर पाणी या कीड नाशकाची फवारणी करावी. मावा किडीच्या नियंत्रणाकरीता डायमिथोएट ३० इ.सी १५ मि.ली./दहा लीटर पाण्यामध्ये मिसळून फवारावे. |
| | ५ | रोग व्यवस्थापन | भुरी रोगाच्या नियंत्रणा करीता सल्फेक्स ०.३० टक्के किंवा २०-२२ ग्रॅम पाण्यात विरघळणारे गंधक १० लीटर पाण्यात मिसळून फवारावे. तसेच ३०० पोताची गंधकाची भुकटी २० किलो प्रती हेक्टरी धुरळणी करावी. |
| ९ | पिकाचा कालावधी | | ६५ ते ७० दिवस |
| १० | उत्पादकता | | ९-११ क्विंटल प्रती हेक्टरी |
| ११ | वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म | | १. भुरी रोगास प्रतीकारक, दाणे मध्यम आकाराचे<br>२. शेंगावर थोड्या प्रमाणात लव असते<br>३. मध्य भारतासाठी शिफारस |
| १२ | वाणासंबंधीचे छायाचित्रे | |  |